# पुणे विद्यापीठ

# नागरिकांची सनद

# “पुणे विद्यापीठ गीत”

***ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान***

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हें पवित्र तीर्थ मानतों
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्त्वपरीक्षा
हें विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

**मंगेश पाडगांवकर**

# पुणे विद्यापीठाविषयी माहिती

# पुणे विद्यापीठ

## नागरिकांची सनद

डॉ. एम.आर. जयकर यांच्या सातत्यपूर्ण व अथक प्रयत्नांमुळे पुणे विद्यापीठाची स्थापना १९४८ साली झाली. तथापि विद्यापीठ औपचाकरीत्या १० फेब्रुवारी, १९४९ रोजी अस्तित्वात आले डॉ.एम.आर.जयकर विद्यापीठाचे पहिले कुलगुरु होते.

**कार्यक्षेत्रः**

आरंभी पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात १२ जिल्हयांचा समावेश होता २३ महाविद्यालये विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात होती आणि फक्त ८ हजार पदवीपूर्व विद्यार्थ्यांनी व १८६ पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी पहिल्या वर्षी नावनोंदणी केली होती.

१९६२ साली शिवाजी विद्यापीठ स्थापन झाले. कोल्हापूर, सोलापूर आणि सातारा हे तीन जिल्हे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात गेल्यामुळे पुणे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र तीन जिल्हयाने कमी झाले. १९७४ साली ठाणे, कुलाबा आणि रत्नागिरी या जिल्हयांतील महाविद्यालयेही मुंबई विद्यापीठाशी सलंग्न करण्यात आले. त्यानंतर १९९० उत्तर महाराष्ट्र विद्यापीठही स्थापन झाले धुळे व जळगाव हे जिल्हे त्यांच्या कार्यक्षेत्रात गेले.

सध्या पुणे, अहमदनगर व नाशिक हे तीनच जिल्हे पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतात. भौगोलिक कार्यक्षेत्राचा जरी संकोच झाला असला तरी पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येणा-या महाविद्यालयांच्या तसेच पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संख्येत सतत वाढ होत आहे. सध्या ६१२ महाविद्यालये, ३०७ मान्यताप्राप्त संस्था पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतात. ५,०४,६५४ पेक्षा अधिक विविध अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी पटावर आहेत आणि ६२,१३० विद्यार्थी बहिःस्थ आहेत.

**विद्यापीठ परिसर :**

विद्यापीठाचा सुरम्य व चित्रवत परिसर ४११ एकरांच्या विशाल क्षेत्रात पसरला आहे. ब्रिटिश काळातील घनदाट हिरवळ, शोभिवंत कारंजे आणि पुणे विद्यापीठाची दिमाखदार भव्य इमारत हया गोष्टी निसर्गप्रेमी, चित्रपट निर्माते, संगीतकार आणि ख्यातकीर्त लोकांचं आकर्षण केंद्र आहे. विद्यापीठाचा संपूर्ण परिसर असंख्य जुन्या वृक्षांनी व्यापलेला आहे. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह आणणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यासाठी नेहमीच प्रोत्साहित करीत असते.

विद्यापीठाच्या परिसरात अनेक इमारती आहेत. उदा. मुख्य इमारत, प्रशासकीय इमारत, सेट भवन, विविध पदव्युत्तर विभाग, विद्यार्थी कल्याण मंडळ विभाग, स्पर्धा परीक्षा केंद्र, जयकर ग्रंथालय, मुद्रणालय, मुलांची व मुलींची वसतिगृहे आणि अनेक उपहारगृहे व भोजनगृहे आहेत.

विद्यापीठाचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे गॉथिक बांधणीची विद्यापीठाची मुख्य इमारत संस्मरणीय असून १८६४ साली तिच्या बांधकामाचा खर्च १,७३,०००/- स्टर्लिंग पौंड इतका आला. आकाशात झेप घेणारा उंच मनोरा असलेली व विद्यापीठाचा ध्वज आकाशामध्ये फडकविणारी ही इमारत म्हणजे रेखीव अशा स्थापत्यशैलीचा प्रतीकात्मक परिचय आहे. सन १९४९ पासून पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुंचे कार्यालय याच इमारतीत आहे.

**विद्यापीठाचे बोधचिन्ह :**

पुणे विद्यापीठाचे बोधचिन्ह असलेला ध्वज विद्यापीठाच्या मुख्य इमारतीवर अभिमानाने फडकत असतो. हा ध्वज म्हणजे लोकांच्या दीर्घकाळाच्या स्वतंत्र विद्यापीठाच्या आकांक्षापूर्तीचे प्रतीक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापना केलेल्या मराठी साम्राज्याचे राज्यकर्ते पेशवे यांचा पुणे शहराच्या केंद्रस्थानी असलेला राजवाडा-शनिवारवाडा कमळाकार-बोधचिन्हाच्या मध्यभागी आहे.
बोधचिन्हाच्या तळाच्यामध्ये दोन्ही कोप-यांतील वर्तुळात पुढील गोष्टी चित्रित केल्या आहेत.

**(अ)** मराठी साम्राज्याची राजधानी असलेला रायगड किल्ला.

**(ब)** सहज नयनगोचर होणारी ऐतिहासिक वास्तू पर्वती.

हया दोन वर्तुळांच्या मधल्या जागेत फुलीच्या आकारात चितारलेल्या दोन तलवारी, हत्तीची डोकी आणि लेखण्या आहेत. शनिवारवाडयाच्या दोन्ही बाजूंना दोन घोडे उभे असून त्यांनी उघडून धरलेल्या पुस्तकावर 'पुणे विद्यापीठ' हे शब्द आणि विद्यापीठ स्थापनेचे १९४८ साल कोरलेले आहे. कोप-यात दोन स्वास्तिके असून या बोधचिन्हाच्या तळाशी विद्यापीठाचे बोधवाक्य लिहिलेले आहे :

**''यः क्रियावान स पण्डितः''**

श्री. माधव परशुराम दीक्षित हया विद्यापीठातील एका विद्यार्थ्याने तयार केलेले हे बोधचिन्ह १९ मे १९५० रोजी औपचारिकपणे स्वीकृत केले. चित्रित केलेले मूळ बोधचिन्ह विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात उत्तमप्रकारे संरक्षित करुन ठेवले आहे.

**२. विद्यापीठ परिसरातील विविध सोयी - मुख्य इमारत :**

मा. कुलगुरुंचे कार्यालय, व्यवस्थापन परिषद, विद्याशाखा, अभ्यास मंडळे इ. शैक्षणिक मंडळांच्या बैठका या इमारतीमधील संत ज्ञानेश्वर सभागृह, शिवाजी सभागृह, यशवंतराव चव्हाण सभागृह व संत गाडगे महाराज सभागृह या प्रतिष्ठित व वैभवशाली सभागृहात होतात.

**जयकर ग्रंथालय :**

विद्यापीठातील जयकर ग्रंथालय हे संदर्भ आणि माहिती या दृष्टीने देशातील सर्वात उत्तम ग्रंथालयांपैकी एक समजले जाते. ग्रंथालयात विदेशी आणि भारतीय नियतकालिके घेतली जातात. याशिवाय अनेक नियतकालिके भेट म्हणून तर कित्येक अदलाबदल करुन मिळतात. ग्रंथालयात ४,६४,८५६ पुस्तके आणि विविध विषयांवरील २२५ नियतकालिक शिर्षके आहेत. महाविद्यालयांना, संस्थांना आणि शासकीय एजन्सीज यांना पुस्तके उसनी देण्याची आंतरग्रंथालयीन सोय जयकर ग्रंथालयाने उपलब्ध करुन दिली आहे. जयकर ग्रंथालय बी.लिब. आणि एम.लिब. या पदवी व पदव्युत्तर वर्गाचे अभ्यासक्रमही चालविते.

जयकर ग्रंथालयाने प्राचीन भारतीय सभ्यतेची अनेक जुनी पुस्तके हस्तलिखितांच्या माध्यमातून संग्रहीत करुन ठेवलेली आहेत.

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बंगलोर, कार्नेजिक मेलन विद्यापीठ, यू.एस.ए. आणि भारत सरकारचे माहिती व तंत्रज्ञान मंत्रालय यांच्या सहकार्याने संगणकीकरण केलेले ग्रंथालयाचे जाळे विणून जयकर ग्रंथालय आपल्या वाचकांना ग्रंथालयीन सेवा व संदर्भ पुरविण्यासाठी नव्या युगात सज्ज झाले आहे. कार्यकारी परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या सभांचे अहवाल स्कॅनिंग करण्याच्या प्रक्रियेत आहेत.

**वसतिगृह, अभ्यागतगृह आणि कर्मचा-यांची निवासस्थाने :**

विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी आठ आणि विद्यार्थिनींसाठी आठ अशी वसतिगृहांची साखळी आहे. या वसतिगृहांत एकूण २१९५ विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था होऊ शकते. ३५ खोल्या असलेले आणि भोजनाची व्यवस्था असलेले अतिशय सुसज्ज अभ्यागतगृहही आहे. विद्यापीठ परिसरात सुमारे १०८ अध्यापकांची व ३३३ अध्यापकेतर कर्मचा-यांच्या निवासाची व्यवस्था आहे.

**आंतरराष्ट्रीय स्थलांतरगृह :**

परदेशांतून येणा-या विद्यार्थ्यांसाठी आणि अतिथी अध्यापकांसाठी आंतरराष्ट्रीय स्थलांतरगृहामध्ये ४२ खोल्या आणि ६ सदनिका आहेत. शिवाय ३ स्वयंपाकगृहे आणि १८ स्नानगृहे आहेत.त्यापैकी ४२ खोल्या पुर्ण भरलेल्या आहेत.

**आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह :**

वसतिगृह परदेशी विद्यार्थ्यांसाठी ९६ खोल्या असून ९ स्वंयपाकगृहे आहेत. तसेच सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी या इमारतीच्या गच्चीचा वापर करता येऊ शकतो. आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रासाठी स्वतंत्र इमारतीचे बांधकाम चालू आहे. या वर्षी ३००० विद्यार्थ्यांनी (९० देश) विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेला आहे.

**क्रीडा संकुल :**

भारतीय युरोपीय सांघिक मैदानी खेळांसाठी आणि क्रीडाप्रकारांसाठी विद्यापीठाच्या परिसरातील विस्तीर्ण क्रीडांगणावर क्रीडासंकुल उभारण्याचे काम विद्यापीठाने सुरु केले आहे. याशिवाय बंदिस्त जागेत खेळल्या जाणा-या निरनिराळया क्रीडाप्रकारांची सोयही उपलब्ध आहे. क्रीडांगणाच्या जवळ असलेल्या क्रीडावसतिगृहाचा सुनियोजित विस्तार करण्यात आलेला आहे. क्रिकेट आणि फुटबॉलसाठी मैदाने तयार आहेत. नैसर्गिक हिरवळीचे काम प्रगतिपथावर आहे. क्रीडावसतिगृहाचा तिसरा टप्पा पूर्ण असून जवळपास ८० पुरुष-महिला खेळाडूंसाठी जून २००५ पासून हे वसतिगृह उपलब्ध होत आहे. प्रशासनाशी संबंधित कामे व बांधकामाशी संबंधित कामे पूर्ण झाल्यामुळे ऑलंम्पिक दर्जाच्या तरणतलावाच्या बांधकामाचा विचार आहे.

**वॉकिंग ट्रॅक :**

१९९९ साली झालेल्या विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमातील एक भाग म्हणून विद्यापीठाच्या मुख्यप्रवेशव्दाराजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात आलेला आहे. या पुतळयापासून सुरु होणारा आणि सुरेख वळणे घेत जाणारा लांबलचक वळणदार वॉकिंग ट्रॅक उभारण्यात आला आहे. आजूबाजूच्या रमणीय देखाव्यातून जाणा-या वॉकिंग ट्रॅकने आरोग्यविषयक जागरुक असणा-या विद्यार्थ्यांबरोबरच अध्यापकवर्गाला आणि सर्व वयोगटांतील नागरिकांना आकर्षित केले आहे. या रस्त्यावरुन पहाटे आणि संध्याकाळी मोठया संख्येने लोक हळूहळू पळत असतात, तर काहीजण शिवाजी महाराजांच्या ऐश्वर्यवान पुतळयाच्या अवतीभवती वती असलेल्या बागेत आकर्षित होत असतात. एकूणच हे दृश्य फारच विलोभनीय असते.

**आरोग्य केंद्र :**

विद्यापीठाच्या परिसरात राहणारे, त्याचप्रमाणे विद्यापीठातील निवासी आणि अनिवासी यांच्यासाठी वैद्यकीय सेवा विद्यापीठाच्या आवारातच उपलब्ध आहे. या केंद्रात नियमितपणे वैद्यकीय सल्ला तर मिळतोच, पण त्याचबरोबर नेहमीच्या वैद्यकीय सोयीही मिळतात. त्याशिवाय ई.सी.जी. काढण्याची आणि डोळे तपासण्याची, दंतोपचाराचीही व्यवस्था आहे. केंद्रात भित्तिपत्रके आणि छोटया पुस्तिका यांच्या सहाय्याने निरनिराळे आजार, धूम्रपान, मद्यपान इत्यादींचे दुष्परिणाम, एड्स, रक्तदान आणि रोगप्रतिबंधक, वगैरे आरोग्याशी संबंधित असलेल्या गोष्टींची माहिती दिली जाते. तसेच तातडीची सेवा उपलब्ध केली असून त्यासाठी २४ तास निवासी डॉक्टर आणि रुग्णवाहिका यांचीही व्यवस्था केलेली आहे. पुणे शहरातील नामवंत डॉक्टर्स वेळोवेळी आरोग्य केंद्राला भेट देऊन आजारी व गरजू रुग्णांना मोलाची वैद्यकीय मदत करतात.

आरोग्य केंद्रात एड्स, कॅन्सर, धूम्रपान, लसीकरण, रक्तदान इ. विषयांवर पत्रके व भित्तिचित्राव्दारे आरोग्य शिक्षणाचे महत्त्वपूर्ण काम चालते.

**बँक आणि पोस्ट सेवा :**

बँक ऑफ महाराष्ट्रच्या विस्तार कक्षामुळे विद्यापीठाच्या परिसरातच बँकिंग सेवा उपलब्ध आहे. हा विस्तार कक्ष नव्या प्रशाकीय भवनात हलविण्यात आल्याने दैनंदिन कामकाजासाठी त्यांना संपूर्ण साधनसामग्रीसह पुरेशी जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. उत्तम सेवा उपलब्ध करुन देणारे एक पोस्ट ऑफिससुध्दा विद्यापीठाच्या आवारातच आहे. त्यामुळे प्रशासन, अध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांची सोय झालेली आहे. विविध मोक्याच्या जागी दूरध्वनी सेवा उपलब्ध आहेत. पुणे विद्यापीठ आणि पुणे शहराच्या विविध प्रभागांत जाणा-या पुणे महानगरपालिकेच्या परिवहन मंडळाच्या अनेक नियमित गाडयांचीही व्यवस्था केलेली आहे.

**उपहारगृहे :**

समाजशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, ग्रंथालय यांच्या मध्यभागी अतिशय शुध्द वातारवरणात असलेले विद्यापीठाचे भोजनगृह स्वच्छ व पौष्टिक भोजन माफक दरात देते. भोजनगृहाशिवाय विद्यापीठाच्या परिसरात असलेली इतरही छोटी-छोटी उपहारगृहे गरजूंना सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत अल्पोपहार व पेये पुरवितात.

**मुद्रणालय :**

विद्यापीठाची छपाईची बहुतेक सर्व कामे पार पाडणारे विद्यापीठाचे स्वतःचे मुद्रणालय आहे. पूर्वीच्या फलटण संस्थानाने पुरविलेली यंत्रसामग्री आणि कर्मचारी यांच्या मदतीने १९५० मध्ये हे मुद्रणालय स्थापन झाले. विद्यापीठाच्या या मुद्रणालयाने नवीन यंत्रसामग्री आणि आधुनिक तंत्रज्ञानाची वेळोवेळी भर घातली. १९८९ साली ऑफसेट छपाईचे यंत्र वापरण्यास सुरुवात झाली. १९९४ पासून मुद्रणालयात डेस्कटॉप पब्लिशिंगची (डी.टी.पी.) सोय उपलब्ध आहे.

**रोजगार माहिती आणि मार्गदर्शन केंद्र :**

विद्यापीठाने सुरु केलेल्या अनेक रोजगार योजनांमुळे नोकरीच्या शोधात असणा-या असंख्य विद्यार्थ्यांना मदत मिळते. स्वयंरोजगार योजनेतून स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी हे केंद्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करते. त्याप्रमाणे रोजगारासंबंधी, भारतात आणि परदेशांत उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्ती व फेलोशिप यांच्याबद्दल माहिती पुरविते. रोजगाराच्या शोधात असणा-या विद्यार्थ्यांसाठी केंद्र नियमितपणे प्रदर्शनांचे व चर्चासत्रांचे आयोजन करते.

## आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र :

पदवीपूर्व, एम.फिल., यांसह अनेक पदव्युत्तर शिक्षणासाठी विविध ६१ देशांतील विद्यार्थी मोठया संख्येने विद्यापीठाकडे आकर्षित होतात. हे विद्यार्थ्यी प्रामुख्याने इराण, अफगाणिस्तान, बहरीन, भूतान, बांगलादेश, इथोओपिया, श्रीलंका, जपान, कोरिया, तुर्किस्थान, व्हिएतनाम, अमेरिका, येमेन, फ्रान्स, जर्मनी, चीन, थायलंड, मॉरिशिअस, ओमान, नेपाळ, सुदान, संयुक्त अरब अमिरात इ. निरनिराळया देशांतून येतात.

पुणे विद्यापीठाच्या विभिन्न अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणा-या परदेशी विद्यार्थ्यांच्या गरजा भागविण्यासाठी आणि एकाच ठिकाणी प्रशासकीय बाबींवर लक्ष ठेवून पदरेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या कार्यपध्दतीत सुसूत्रता आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय केंद्राची स्थापना करण्यात आली. ज्या परदेशी विद्यार्थ्यांचे इंग्रजी कच्चे आहे अशांसाठी इंग्रजीतील प्रावीण्य वाढविण्यासाठी विशेष अभ्यासक्रमाची व्यवस्था या केंद्रात करण्यात आली आहे.

कॅनडीयन विद्यार्थ्यांसाठी कॅलगरी विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली स्टडी अब्रॉड प्रोग्रॅमचे आयोजन सप्टेंबर ते नोव्हेंबर दरम्यान दरवर्षी केले जाते.

इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्सच्या सहकार्याने परदेशी विद्यार्थ्यांच्या सहभागासह या केंद्राव्दारे सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात.

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्रातर्फे परदेशी विद्यार्थ्यांसाठी युवक महोत्सवाचेही आयोजन केले जाते. या केंद्रातर्फे आयोजित करण्यात येणा-या या महोत्सवाचा अनेक देशांच्या राजदूतांनी गौरव केला आहे.

## शैक्षणिक प्रसारमाध्यम संशोधन केंद्र (ई.एम.एम.आर.सी.) :

‘कंट्रीवाइड क्लासरुम’ प्रकल्पातील शैक्षणिक दूरध्वनी कार्यक्रमांना चालना देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने जी काही केंद्र स्थापन केली, त्यांपैकी पुणे विद्यापीठातील केंद्र हे एक होय. या केंद्राचा स्टुडिओ आधुनिक आहे आणि अत्याधुनिक उपकरणेही त्यात आहेत. या केंद्राने अनेक पुरस्कारप्राप्त चित्रफिती तयार केल्या आहेत. हे देशातील अग्रगण्य केंद्र आहे. या केंद्राने तयार केलेल्या शैक्षणिक चित्रफितींना मानाचे समजले जाणारे अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. या केंद्राने आखिल भारतीय स्तरावर व्हिडीओ स्पर्धांमध्ये सादर केलेल्या ‘ऑटीझम-इन्-ए वर्ल्ड देअर ओन : कॅटगरी चिल्ड्रन ॲण्ड विमेन्स इश्यूज’ या चित्रफितीला पुरस्कार प्राप्त झाला. या केंद्राकडे शैक्षणिक चित्रफितींचा फार मोठया प्रमाणावर संग्रह उपलब्ध आहेत.

## अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालय (ॲकेडेमिक स्टाफ कॉलेज) :

पुणे विद्यापीठातील अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालय हे देशातील पहिले असून विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या आर्थिक साहयाच्या आधारावर १९८७ साली विद्यापीठाच्या आवारात अध्यापकांसाठी अनुलक्षी व पुनर्अभ्यास वर्ग घेण्यासाठी आणि अध्यापकांना अध्यापन पध्दतीच्या शास्त्रांची माहिती व्हावी म्हणून स्थापना केलेली आहे.

## बहि:शाल शिक्षण मंडळ :

पुणे विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरु डॉ. एम.आर.जयकरांच्या पुढाकारामुळे विद्यापीठाच्या अगदी प्रारंभीच्या काळात बहि:शाल शिक्षण मंडळाची स्थापना झाली विद्यापीठातील उच्च शिक्षणातील ज्ञानाचा ओघ थेट सर्वसामान्य लोकांपर्यंत विशेषत: खेडयापाडयातील गरीब आणि अशिक्षित लोकांपर्यत पोहचविणे हे बहि:शाल शिक्षण मंडळाचे उद्दिष्ट होते.

हे मंडळ व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा व सामाजिक न्यायाला अनुसरुन शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन करते डॉ. जयकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विविध महाविद्यालयातून जयकर व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तीनही जिल्हयांमध्ये मंडळाने सुमारे १८६ केंद्र स्थापन केली आहेत. सामाजिक उन्नतीसाठी केलेल्या या प्रयत्नांना प्रशंसनीय योगदान म्हणून विविध स्थरावर मान्यता मिळत आहे.

**विद्यार्थी कल्याण मंडळः**

विद्यापीठातील विभाग, संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थामधील विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करते वादविवाद व वक्तृत्व-स्पर्धा नाटयशिबीरे हे त्यापैकी काही कार्यक्रम होत. यांपैकी 'कमवा व शिका' योजना, विमा योजना, डॉ. बी.पी.गजेंद्रगडकर वाद न्यायालय स्पर्धा कुलपती डॉ.पी.सी. अलेक्झांडर वक्तृत्व-स्पर्धा, नाटय शिबीरे आणि आंतरविद्यापीठीय युवक-महोत्सव हे कार्यक्रम अधिक लोकप्रिय आहेत. उपयोजित शिक्षणाच्या रुपात सामाजिक व आर्थिक मागासलेल्या विद्यार्थ्यांनसाठी विशेष कल्याणकारी योजना राबविली जाते.

**३. शैक्षणिक :**

विद्यापीठात पुढील १३ विद्याशाखांत विविध विषयांच्या अध्ययनाची व्यवस्था आहे :

**१** कला व ललितकला विद्याशाखा
**२** मानस, नीती आणि सामाजिकशास्त्र विद्याशाखा
**३** विज्ञान विद्याशाखा
**४** विधी विद्याशाखा
**५** वैद्यक विद्याशाखा
**६** अभियांत्रिकी विद्याशाखा
**७** आयुर्वेद औषधशास्त्र विद्याशाखा
**८** वाणिज्य विद्याशाखा
**९** शिक्षणशास्त्र विद्याशाखा
**१०** व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा
**११** औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा
**१२** होमिओपॅथी विद्याशाखा
**१३** शारिरीक शिक्षण विद्याशाखा

विद्याशाखा पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक कार्यक्रमांशिवाय विषयांत प्रमाणपत्र आणि पदविका शिक्षणक्रमसुध्दा आयोजित करते.

**विद्यापीठाची शैक्षणिक व इतर अधिकार मंडळे :**

पुणे विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात अध्ययन आणि संशोधन हयामध्ये फार मोठे यश संपादन केले आहे. विद्यापरिषद, विद्याशाखा, मंडळे, बहि:शाल शिक्षण मंडळ अशा विविध मंडळांनी घेतलेल्या निर्णयांचाच हा परिणाम आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृत परिषदेने विद्यापीठाला 'पंचतारांकित' दर्जा दिला असून विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठाच्या शैक्षणिक क्षमतेला दिलेली ही मान्यता आहे आणि म्हणूनच आंतरराष्ट्रीय सुरक्षा आणि संरक्षण विश्लेषण यासाठी राष्ट्रीय केंद्र स्थापन करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने पुणे विद्यापीठाची निवड केली आहे.

**विद्यापीठाची शैक्षणिक व इतर अधिकार मंडळे पुढीलप्रमाणे :**

१. अधिसभा
२. व्यवस्थापन परिषद
३. विद्या परिषद
४. विद्याशाखा
५. महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळ
६. अभ्यास मंडळ
७. आंतरशाखा शिक्षण मंडळ
८. परीक्षा मंडळ
९. प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार मंडळ
१०. विद्यार्थी परिषद.

वरिल १० अधिकार मंडळांबरोबरच ५८ अभ्यास-मंडळे, ५० तदर्थ अभ्यासमंडळे आणि १८६ बहि:शाल शिक्षण केंद्र आहेत.

## ४. प्रथम पदवीस्तरावरील व्यवसायभिमुख शिक्षण :

प्रथम पदवीस्तरावरील शिक्षणक्रमांत व्यवसायाभिमुख शिक्षण पुणे विद्यापीठात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पुढाकाराने आणि आर्थिक साहाय्यने १९९४-९५ साली सुरु झाले. बी.ए., बी.एस्सी. आणि बी.कॉम. स्तरांवर निरनिराळे व्यवसायाभिमुख शिक्षणक्रमाचा समावेश करण्यामागचा उद्देश आपल्या आवडत्या व्यवसायात नोकरी मिळवावयाची क्षमता वाढविण्यासाठी अथवा स्वतःच एक यशस्वी उद्योजक होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि प्रशिक्षण देणे हा आहे.

प्रथम पदवीस्तरावर चार विद्याशाखांमध्ये खालील व्यवसायाभिमुख शिक्षण दिले जाते.

| **विद्याशाखा क्षेत्र** | | **विषय** |
|---|---|---|
| **१ कला, मानसशास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे** | १ | हिंदीचे व्यवहारिक ज्ञान |
| | २ | संस्कृतचे व्यवहारिक ज्ञान |
| | ३ | इंग्रजीचे व्यवहारिक ज्ञान |
| | ४ | पुरातत्वशास्त्र व वस्तुसंग्रहायलयशास्त्र |
| **२ वाणिज्य, अर्थ व व्यवस्थापनशास्त्र** | १ | प्रिन्सिपल्स ॲण्ड प्रॅक्टिसेस ऑफ इन्शुअरन्स |
| | २ | संख्याशास्त्र |
| | ३ | ऑफिस मॅनेजमेंट ॲण्ड सेक्रेटरीयल प्रॅक्टिसेस |
| | ४ | टॅक्स प्रोसिजर्स ॲण्ड प्रॅक्टिसेस |
| | ५ | फॉरेन ट्रेड प्रॅक्टिसेस ॲण्ड प्रोसिजर्स |
| | ६ | पर्यटन व प्रवास व्यवस्थापन |
| | ७ | जाहिरात, विक्रिवृध्दिकला व विक्री |
| | ८ | संगणकाचा वापर |
| **३ विज्ञान** | १ | औद्योगिक रसायनशास्त्र (सात प्रवाह) |
| | २ | अन्नशास्त्र व गुणवत्ता नियंत्रण |
| | ३ | वैद्यकीय पोषण-आहारशास्त्र |
| | ४ | औद्योगिक सूक्ष्मजीवशास्त्र |
| | ५ | जैव तंत्रज्ञान |
| | ६ | जीवशास्त्रीय कौशल्य आणि प्रातिनिधिक तयारी |
| | ७ | जीव तंत्रज्ञान |
| | ८ | रेशीम तंत्रज्ञान |
| | ९ | औद्योगिक मत्स्य आणि मत्स्यव्यवसाय |
| | १० | शास्त्रीय उपकरणविद्या |
| | ११ | दुर्बीण उपकरणे |
| | १२ | जिओएक्स्प्लोरेशन ॲण्ड ड्रिलिंग टेक्नॉलॉजी |
| | १३ | जनसंपर्क व दूरचित्रवाणीनिर्मिती |
| | १४ | स्थिर छायाचित्रण व दृक्-श्राव्य कार्यक्रमनिर्मित |
| | १५ | खतजनक आणि जलव्यवस्था |
| **४ अभियांत्रिक तंत्रज्ञान** | १ | इलेक्ट्रॉनिक इक्विपमेंट मेंटेनन्स |
| | २ | कॉम्प्यूटर मेंटनन्स |
| | ३ | इलेक्ट्रिकल इक्विपमेंट मेंटेनन्स |
| | ४ | एन्व्हायरन्मेंट ॲण्ड वॉटर मेंटेनन्स |
| | ५ | ग्रामीण तंत्रज्ञान |
| | ६ | ऑटोमोबाइल मेंटनन्स |
| | ७ | रिफ्रिजरेशन ॲण्ड एअर कण्डिशनिंग मेंटेनन्स |
| | ८ | बांधकाम तांत्रिक व्यवस्थापन |
| | ९ | निर्मितिप्रक्रिया |

व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरु केल्यामुळे विद्यापीठ, महाविद्यालये आणि औद्योगिक संस्था यांच्यात परस्परहिताचे संबंध प्रस्थापित होण्यास मदत झाली आहे. असे शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या अनेक पदवीधरांना औद्योगिक क्षेत्रांत चांगल्या नोक-या मिळाल्या आहेत किंवा काहीजणांनी स्वतःचे व्यवसाय सुरु केले आहेत.

**५. अध्यापन परीक्षण उपक्रम :**

उच्च शिक्षणाची गुणवत्ता अधिक वाढावी म्हणून पुणे विद्यापीठ जोमाने विद्यापीठातील विभागांत तसेच महाविद्यालयांत अध्यापन परीक्षण उपक्रम राबवीत आहे. हा उपक्रम महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळाच्या मार्गदर्शनाखाली व सर्वसाधारण पर्यवेक्षणाखाली राबवीत आहे. उच्च शिक्षणाची गुणवत्ता ही संकल्पना आणि बंगलोर येथील नॅक या परिषदेने विकसित केलेल्या गुणवत्ता मुल्यांकन पध्दतीप्रमाणे महाविद्यालयांचे अध्यापन परीक्षण आणि मूल्यांकन करण्याची विद्यापीठाची योजना आहे. ही निश्चितच उल्हासित करणारी गोष्ट आहे की, अध्यापन परीक्षण उपक्रम अतिशय यशस्वी होत आहे. तो केवळ शहरातील महाविद्यालयांतच नव्हे तर इतर संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतही होत आहे.

**६. महाविद्यालयांची गुणवत्ता सुधारण्यासाठी आर्थिक सहाय्य :**

विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना गुणवत्ता विकसित करण्यासाठी आवश्यक ती आर्थिक मदत करते, त्याचा तपशील :

**(अ)** विद्यापीठातील आणि महाविद्यालयांतील अध्यापकांना त्यांचे संशोधनपर निबंध सादर करण्यासाठी देशातील आणि देशाबाहेरील विद्यापीठांना किंवा संस्थांना भेट देण्यास विद्यापीठातर्फे प्रोत्साहन दिले जाते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निधीतून अनुदान देऊन अशा अध्यापकांच्या प्रवास व इतर खर्चांपैकी कही खर्च भागविला जातो.

**(ब)** शिक्षकेतर कर्मचा-यांची प्रशासकीय पात्रता वाढावी यासाठी विद्यापीठ तशा प्रकारची चर्चासत्रे आणि कार्यशाळा आयोजित करण्यासाठी आर्थिक अनुदान देते.

**(क)** विद्यापीठातील व महाविद्यालयांतील नामांकित अध्यापक आणि विभिन्न क्षेत्रांतील तंज्ञ यांची व्याख्याने आयोजित करण्यासाठी ही आर्थिक अनुदान दिले जाते. अध्यापक व विद्यार्थी यांच्यात शैक्षणिक समृध्दता आणण्यासाठी अशा व्याख्यानांचे आयोजन केले जाते.

**७. आंतरराष्ट्रीय सहभागावर आधारित कार्यक्रम :**

इंग्लंड, कॅनडा, अमेरिका, जर्मनी आणि जपान हया देशांतील विद्यापीठांच्या सहभागाने चालणारे अनेक कार्यक्रम विद्यापीठात सुरु आहेत. हया कार्यक्रमांमध्ये विज्ञान, कला, भाषा हया विद्याशाखांतील अनेक विषयांचा समावेश आहे. ज्या विद्यापीठांशी पुणे विद्यापीठाचे सहकार्य आहे ती विद्यापीठे पुढीलप्रमाणे :

१. युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्व्हानिया
२. युनिव्हर्सिटी ऑफ नॉर्थ कॅरोलिना
३. युनिव्हर्सिटी ऑफ कॉर्नेल
४. युनिव्हर्सिटी ऑफ इंडियाना
५. युनिव्हर्सिटी ऑफ नागोया
६. युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क
७. युनिव्हर्सिटी ऑफ मॅचेस्टर
८. युनिव्हर्सिटी ऑफ ईस्ट ॲन्‍लेया.

याशिवाय 'स्टडी अब्रॉड प्रोग्रॅम' या कार्यक्रमांतर्गत विद्यापीठाचा काही परदेशी विद्यापीठांबरोबर सहभाग आहे. जसे युनिव्हर्सिटी ऑफ लुसान (स्वित्झर्लंड), युनिव्हर्सिटी ऑफ कॅलगरी (कॅनडा), युनिव्हर्सिटी ऑफ तेहरान (इराण), युनिव्हर्सिटी ऑफ ब्रेमेन (जर्मनी) आणि युनिव्हर्सिटी ऑफ सेंट्रल क्वीन्सलॅण्ड (ऑस्ट्रेलिया).

वरील आंतरराष्ट्रीय विद्यापीठांच्या सहकार्याने भारत आणि इतर देशांच्या अभ्यास व संशोधकांना लाभ होतो. शिवाय त्यामुळे पुणे विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय प्रतिमाही वृध्दिंगत होते.

## ८. विद्यापीठ आणि सेनादल - अन्योन्यसंबंध :

पुणे विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाने भारतीय सेनादलाशी दृढ संबंध विकसित केले आहेत. पुणे विद्यापीठ आणि भारतीय सेना हया दोघांच्या संयुक्त विद्यमाने 'रेसिडेंट स्कॉलर प्रोग्रॅम' या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमामुळे सेनादलातील वरिष्ठ अधिका-यांना विद्यापीठात अध्ययन आणि भारतीय सेनेला उपयोगी पडेल असे पुणे विद्यापीठात संशोधन करणे शक्य होते. त्याशिवाय विद्यापीठातील तज्ज्ञांशी विचारविनिमय करता येतो.

राजनीतीच्या अध्ययनाकरिता विद्यापीठात 'छत्रपती शिवाजी अध्यासन' स्थापन करण्यात आले. त्याकरिता भूतपूर्व लष्करप्रमुख कै. बी. सी. जोशी यांनी १५ लाख रूपयांची देणगी दिली आहे.

लंडन येथील 'इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ स्टडीज' यासह विभिन्न आंतरराष्ट्रीय संस्थांनी 'ॲन्युअल वर्ल्ड सर्व्हे ऑफ दि डिफेन्स ॲण्ड स्ट्रॅटेजिक स्टडीज' मध्ये विद्यापीठाच्या या विभागाची नोंद घेतली आहे हे विद्यापीठाला भुषणावह आहे.

लष्करातील निवृत्त वरिष्ठ अधिका-यांनी स्थापन केलेल्या 'सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड स्ट्रॅटेजिक स्टडीज (सी.ए.एस.एस.)' या केंद्राबरोबर विद्यापीठाने राजनैतिक धोरणांच्या विश्लेषणात संशोधन करण्यासाठी एक संमतिज्ञापन करार केला आहे. हे केंद्र पुणे विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र या विभागातच आहे.

## ९. सी-डॅकबरोबर अध्ययनात सहभाग :

सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स कॉम्प्यूटिंग (सी-डॅक) या विद्यापीठाच्या परिसरातच असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या केंद्राबरोबर विद्यापीठाचे अध्ययनक्षेत्रात अतिशय दृढ संबंध आहेत. विद्यापीठ आणि सी-डॅक यांच्या अध्ययनक्षेत्रात चालू असलेल्या परस्पर देवाण-घेवाण कार्यक्रमाचा पुष्कळ विद्यार्थी, संशोधक आणि विद्यापीठातील अध्यापक यांना लाभ मिळाला आहे. सी-डॅकच्या सहकार्याने एक 'माहिती-तंत्रज्ञान केंद्र (सी.आय.टी.)' विद्यापीठाच्या परिसरातच विद्यापीठ लवकरच स्थापन करणार आहे. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात मनुष्यबळ निर्माण करण्यास हे केंद्र मदत करील.

## १०. विद्यापीठ - एन.सी.सी.एस. - आयुका आणि एन.सी.आर.ए. - अन्योन्यसंबंध :

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या पुढे उल्लेख केलेल्या सहा संस्था विद्यापीठाच्या परिसरातच आहेत :

१. नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस (एन.सी.सी.एस.)
२. इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी ॲण्ड ॲस्ट्रोफिजिक्स(आयुका)
३. नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रॉलॉजी (एन.सी.आर.ए.)
४. सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्यूटिंग (सी-डॅक)
५. बायोइन्फर्मॅटिक्स सेंटर
६. वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट

या संस्थांशी आणि या संस्थांमध्ये कार्यरत असणा-या तज्ज्ञांशी शैक्षणिक बाबतीत विचारविनिमय करून विद्यापीठातील विद्यार्थी आणि अध्यापक आपला फायदा करून घेत आहे.

विद्यापीठाने इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ट्रॉपिकल मिटिअरॉलॉजी (आय.आय.टी.एम.), इंडियन मेट्रॉलॉजी डिपार्टमेंट (आय.एम.डी.), नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (एन.सी.एल.), नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बँकिंग मॅनेजमेंट (एन.आय.टी.एम.), नॅशनल ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूट (एन.ए.आर.आय.) यांसारख्या स्थानिक संस्थांशी आणि एन.जी.आर.आय. (हैदराबाद), ओ.एन.जी.सी., आय.एस.आर.बी., बी.ए.आर.सी. यांसारख्या बाहेरच्या संस्थांबरोबर शैक्षणिक संबंध प्रस्थापित केल्यामुळे पदव्युत्तर अध्ययन कार्यक्रमांचा विद्यापीठ परिसरातच लाभ घेता येतो.

## ११. विज्ञान आणि तंत्रज्ञान वाटिका :

नवीन उद्योगधंदे काढण्याची वृत्ती वाढीस लागावी, तरुण विद्यार्थ्यांमधील नवीन उद्योग काढण्याच्या उद्यमशीलतेचा विकास व्हावा या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी भावी आणि प्रस्थापित उद्योजकांना मदत करण्यासाठी काही वर्षापूर्वी विज्ञान आणि तंत्रज्ञान वाटिकेची स्थापना झाली. सल्लामसलत, उत्पादित वस्तूंमध्ये सुधारणा, सॉफ्टवेअरचा विकास, चाचणी, पृथकरण हया व इतर अशाच प्रकारच्या सेवा पुरवून विज्ञान आणि तंत्रज्ञान वाटिकेने औद्योगिक संस्थांशी संबंध प्रस्थापित केले आहेत.

विद्यापीठाच्या विभिन्न पदव्युत्तर विभागांतील शास्त्रज्ञ व संशोधक विद्यार्थी, विज्ञान आणि तंत्रज्ञान वाटिकेतर्फे आपल्या शास्त्रीय, तांत्रिक आणि सॉफ्टवेअर क्षेत्रांतील विशेष ज्ञानाचा लाभ पुण्यातील व पुण्याच्या आजूबाजूच्या आणि इतर ठिकाणच्या उद्योजकांना देत असतात.

रसायनशास्त्र विभागाजवळच्या स्वतःच्या सुंदर इमारतीत विज्ञान आणि तंत्रज्ञान वाटिका आहे. इमारतीची एकूण किंमत १ कोटी ५० लाखांहून जास्त आहे. पुणे विद्यापीठ आणि सी-डॅक यांच्यातील संमतिज्ञापन करारानुसार इमारतीचा सर्व खर्च सी-डॅकन संस्थेने उचलला आहे. या इमारतीचा वापर सी-डॅक व विज्ञान आणि तंत्रज्ञान वाटिका या दोन्हीही संस्था करतात.

संस्थेच्या नियमित खर्चासाठी आणि निरनिराळे कार्यक्रम राबविण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान वाटिकेला गेली १० वर्षे केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्यातर्फे आर्थिक मदत मिळत आहे.

## १२. महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळ :

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, संस्था व विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे अध्ययनविषयक नियोजन आणि विकास महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळ पाहते. नवीन महाविद्यालये किंवा संस्था स्थापन करण्यासाठी दरवर्षी विभिन्न संस्थांकडून आलेल्या अर्जांची छाननी करुन महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळ आपल्या शिफारशींसह ते अर्ज विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेकडे पाठविते.

विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांच्या, शैक्षणिक संस्थांच्या तसेच विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांच्या गुणवत्तेत सुधारणा व्हावी म्हणून हे मंडळ वर उल्लेखिलेल्या सर्वांच्या परीक्षणाचीही काळजी घेते.

शैक्षणिक विकासासाठी राष्ट्रीय संस्थांकडून आणि इतरांकडून महाविद्यालये आणि विद्यापीठातील शैक्षणिक विभाग यांना मिळणा-या आर्थिक निधीचा विनियोग करण्याचे कामसुध्दा हेच मंडळ करते. भारतातील किंवा परदेशांतील विद्यापीठे वा संशोधन संस्था यांच्याशी शैक्षणिक सहकार्य प्रस्थापित करण्यास महविद्यालयांतील आणि विद्यापीठांतील निरनिराळया शैक्षणिक विभागांना हे मंडळ मदत करते.

## १३. केंद्रीय मूल्यमापन कार्यक्रम (सी.ए.पी.) :

विद्यापीठाने निरनिराळया परीक्षांसाठी १९८० पासून केंद्रीय मूल्यमापन कार्यक्रमाचा अवलंब केला आणि बी.ए., एम.ए., बी.कॉम., बी.सी.एस., बी.ई., एल.एल.बी., इत्यादी परीक्षांचा केंद्रीय मूल्यमापन पध्दतीत समावेश केला आहे. विशिष्ट परीक्षेसाठी असलेल्या केंद्रीय मूल्यमापन पध्दतीच्या केंद्रावर केल्या जाणा-या मूल्यमापनाच्या व पुनर्मूल्यमापनाच्या कार्यात बहुसंख्य अनुभवी अध्यापक कार्यरत आहेत.

केंद्रीय मूल्यमापन कार्यक्रमामुळे मूल्यमापन पूर्ण करुन निकाल वेळेत प्रसिध्द करणे शक्य झाले आहे.

१९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसारच ही यंत्रणा आहे. या पध्दतीची यशस्वीपणे अमंलबजावणी केल्यामुळे बहूतेक सर्व परीक्षांचे निकाल परीक्षा झाल्यानंतर निर्धारित कालावधीत घोषित केले जातात. यामुळे विद्यार्थ्यांना पुढील शेक्षणिक प्रगतीची योजना तयार करण्यास मदत होते.

## १४. विद्यापीठाच्या विशेष ठळक नोंदी :

**(अ)** पुणे विद्यापीठ हेल्पलाइन एच.आय.व्ही. एड्स यावर दूरध्वनीवरुन मार्गदर्शन दिनांक १ डिसेंबर, १९९९ पासून देण्यात येत आहे.

**(ब)** स्वास्थ्य तपासणी केंद्र दि. १ जानेवारी, २००२ पासून सुरु झाले आहे.

**(क)** मार्च २००२ पासून लोणावळा येथील 'श्री माधव योगा मंदिर समिती कैवल्यधाम' यांच्या सहकार्याने व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक मदतीने योग शिक्षण केंद्र सुरु केले आहे.

**(ड)** पुणे विद्यापीठ आणि डिपार्टमेंट ऑफ ॲटोमिक एनर्जी, बोर्ड ऑफ रिसर्च इन् न्यूक्लिअर सायन्सेसच्या संयुक्त विद्यमाने पुरोगामी संशोधनाचे राष्ट्रीय केंद्र (एन.सी.एफ.आर.आर.) हा ५ कोटींचा प्रकल्प उभारलेला आहे.

**(इ)** प्राणिशास्त्र विभागत सी.एस.आय.आर., डी.ए.ई.बी.आर.एन.एस., डी.एस.टी., डी.आर.डी.ओ., यू.जी.सी. कडून संशोधनार्थ अनुदान मिळाले आहे.

**(फ)** मा. प्रधानमंत्र्यांच्या 'जय विज्ञान' या वैज्ञानिक व तंत्रज्ञानसंबंधित योजनाअंतर्गत पुणे विद्यापीठाच्या जैवमाहितीशास्त्र केंद्राने ई.बी.आय. (युरोपियन बायोइन्फर्मेटिक्स इन्स्टिटयूट) च्या धर्तीवर मिररसाइट, डेटा बेस (माहितीकोश) व सॉफ्टवेअर विकसित केले आहे. जॅपनीज एन्सेफलायटिस या रोगावर लस शोधण्यासाठी प्रकल्प हाती घेतला आहे. बायोइन्फर्मेटिक्स केंद्राला बायोटेक्नॉलॉजी (जैवतंत्रज्ञान) केंद्राची 'उत्कृष्ट केंद्र' (Centre of Excellence) अशी मान्यता मिळाली आहे.

**(ग)** आतंरराष्ट्रीय सुरक्षितता व संरक्षण विश्लेषण केंद्र स्थापन करण्याबद्दल विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १५ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे.

**(ह)** विद्यापीठ अनुदान आयोगाने पुणे विद्यापीठास सर्वोच्च दर्जा दिला आहे. त्यामुळेच बायोइन्फर्मेटिक्स आणि बायोटेक्नॉलॉजी केंद्रासाठी ३० कोटी रुपये मंजूर झाले आहेत.